**अर्ज (नि.क्र.६२) व त्यावरील आदेशान्वये, वादी प्रदीप मुकुंदराव कुलकर्णी यांचेतर्फे सर्वाधिकारपत्राद्वारे सर्वाधिकारपत्र धारक सा.क्र.२**

**मी सत्य प्रतिज्ञेवर शपथपूर्वक निवेदन करतो की,**

**वादीतर्फे साक्षीदार क्र.२ यांची जबानी**

माझे संपूर्ण नाव – पंकज प्रदीपराव कुलकर्णी उर्फ नणंदकर,

वय– ३६ वर्षे, व्यवसाय– शेती,

राहणार– नणंद, ता. निलंगा, जि. लातूर

**वादीकरीता अतिरिक्त सरतपास विधीज्ञ श्री. जे. के. देशपांडे यांच्या वतीने शपथेवर सुरू**

७. दिनांक ३१.१२.२०२५ रोजीचे सर्वाधिकारपत्र मला आता वाचून दाखविले, ते तेच आहे, ते माझे वडील प्रदीप मुकुंदराव कुलकर्णी यांनी माझ्या हक्कात करुन दिलेले आहे, त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे, त्यावर माझी सही व वडीलांचा अंगठा आहे. ते सर्वाधिकारपत्र (**नि.क्र.७९**) वर आहे.

**सरतपास पूर्ण.**

**प्रतिवादी क्र.१ व त्यांचे विधीज्ञ पुकारले असता गैरहजर, त्यांच्यावतीने अर्जही नाही. करीता प्रस्तूत प्रकरण प्रतिवादी क्र.१ यांच्याकडून होणाऱ्या या साक्षीदाराच्या उलटतपासाविना पुढे चालेल.**

<u>प्रतिवादी क्र.२ व ३ करीता उलटतपास विधीज्ञ श्री. जी. आर. साळुंके यांच्या वतीने सुरु</u>

८. मुकुंदराव कुलकर्णी हे माझे आजोबा होते. दावा मिळकतीचे मूळ मालक मुकुंदराव कुलकर्णी हे होते हे म्हणणे खरे आहे. कुमोदिनी वसंतराव अट्टरगेकर या माझ्या आत्या आहेत. माझे आजोबा मुकुंदराव कुलकर्णी यांनी माझ्या आत्या कुमोदिनी वसंतराव अट्टरगेकर यांना भूमापन क्र.५०२ मधील मिळकत विक्री केली हे म्हणणे खरे आहे. माझ्या आत्या कुमोदिनी वसंतराव अट्टरगेकर यांच्याकडून भूमापन क्र.५०२ मधील ते क्षेत्र प्रतिवादी क्र.२ ज्योती कदम यांनी खरेदी करुन तसे खरेदीखत झाले आहे हे म्हणणे खरे आहे. त्या खरेदीखतानंतर माझ्या आत्या कुमोदिनी यांनी माझ्या वडीलांसमक्ष प्रतिवादी क्र.२ ज्योती कदम यांना त्यांच्या हक्कातील खरेदीखताप्रमाणे भूमापन क्र.५०२ मधील खरेदी मिळकतीचा ताबा दिला हे म्हणणे खरे आहे. माझ्या वडीलांच्या समक्ष मोजणी झाली किंवा नाही हे मला माहीत नाही. भूमापन क्र.५०१ च्या पश्चिमेस भूमापन क्र.५०२ आहे हे म्हणणे खरे आहे. भूमापन क्र.५०१ आणि भूमापन क्र.५०२ मधील मिळकती एकमेकांलगत आहेत. भूमापन क्र.५०१ आणि भूमापन क्र.५०२ मधील सामाईक बांध हा दक्षिण–उत्तर असून तो बांध सुमारे ५ ते १० फुट रुंद आहे. भूमापन क्र.५००, भूमापन क्र.५०१ आणि भूमापन क्र.५०२ च्या मोजणीची फीस माझ्या वडीलांनी भरली होती हे मला माहीत नाही. दिनांक ०८.०४.२०२२ रोजीचा न्यायालय आयुक्त नेमणुकीचा आदेश मला माहीत नाही व तो मला विधीज्ञांनी सांगितलेला नाही. मोजणी अधिकारी मोजणी करत असताना मी हजर नव्हतो. मोजणीच्या वेळी माझे वडील हजर होते

एवढेच मला माहीत आहे, माझ्या वडीलांशिवाय त्यावेळी इतर कोणी हजर होते किंवा नाही हे मला माहीत नाही. भूमापन क्र.५०२ मधील अंतर्गत भूधारकांच्या ७/१२ उतारे व खरेदीपत्रामध्ये नमूद क्षेत्राप्रमाणे मोजणीदाराने हद्दी खुणा निश्चित केल्या किंवा नाही हे मला माहीत नाही. भूमापन क्र.५०२ मधील अंतर्गत भूधारकांच्या ७/१२ उतारे व खरेदीपत्रामध्ये नमूद क्षेत्राप्रमाणे मोजणीदाराने मोजणीदाराने हद्दी खुणा निश्चित केल्या किंवा नाही याबाबत मी माझ्या वडीलांना विचारणा केली नाही. माझ्या वडीलांना अद्यापपर्यंत समज व बूज नसल्यामुळे मी त्यांना त्याबाबत विचारणा केली नाही. माझ्या वडीलांना अद्यापपर्यंत समज नसल्यामुळे मी खोटे सर्वाधिकारपत्र त्यांच्याकडून करुन घेतले हे म्हणणे खरे नाही. माझ्या वडीलांना अद्यापपर्यंत समज नसल्यामुळे त्यांना सर्वाधिकारपत्रामधील लिहिलेला मजकूर कळालेला नाही हे म्हणणे खरे आहे. मी खोटा सरतपास दाखल केला हे म्हणणे खरे नाही. माझ्या वडीलांना अद्यापपर्यंत समज नसल्यामुळे त्यांनी मला दाव्याबाबत आतापर्यंत काहीही सांगितलेले नाही हे म्हणणे खरे नाही, साक्षीदार पुढे स्वतः सांगतात अपघातपुर्वी माझे वडील व माझ्यामध्ये दाव्या बाबत बोलणे होत होते. माझे वडील व माझ्यामध्ये दावा चालू आहे, मोजणी झाली अशी बोलणी झाली होती. सर्वाधिकारपत्राप्रमाणे मला न्यायालयात साक्ष देण्याचे हक्क नाही हे म्हणणे खरे नाही.

प्रश्नः– भूमापन क्र.५०२ मधील सर्व सहहिस्सेदारांची नावे तुम्हाला माहीत आहेत काय?

उत्तरः– माझ्या लगत सहहिस्सेदारांची नावे तेवढी मला माहीत आहेत.

९. प्रतिवादी ज्योती कदम, धनश्री कदम, सरदार मोमीन व काळे यांची मला नावे माहित आहेत. भूमापन क्र.५०१ व ५०२ हे एकमेकांलगत आहेत हे म्हणणे खरे आहे. भूमापन क्र.५०१ व ५०२ हे एकमेकांलगत असल्यामुळे भूमापन क्र.५०२ मध्ये माझा ताबा नाही हे म्हणणे खरे नाही. भूमापन क्र.५०२ मधील १९ आर क्षेत्रावर माझा ताबा आहे.

**<u>प्रतिवादी क्र.२ व ३ यांचे विधीज्ञ श्री. जी. आर. साळुंके यांच्या तोंडीविनंतीवरुन पुढील उलटतपास तहकूब.</u>**

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by PANDE RAVI VIJAYPRASAD
Date: 2026.03.02 16:20:32 +0530

(रवि वि.पांडे)

दिनांक ०२/०३/२०२६.

दिवाणी न्यायाधीश, व.स्तर
निलंगा,जि.लातूर.